**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ८३/२०२०** **दिनांक १६/१०/२०२०** **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२७५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १०/१०/२०२० ते १६/१०/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १७/१०/२०२० सकाळी ८:३० पासून २१/१०/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १०/१० | ११/१० | १२/१० | १३/१० | १४/१० | १५/१० | १६/१० | | १७/१० | १८/१० | १९/१० | २०/१० | २१/१० |
| ०.० | १.० | २.४ | ४.२ | १२.४ | १२४.२ | - | **पाऊस (मिमी)** | १० | २ | ४ | ५ | १० |
| ३४.७ | ३२.८ | २९.८ | ३१.८ | ३४.० | ३०.४ | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३० | ३० | ३१ | ३१ | ३२ |
| २४.४ | २३.८ | २२.८ | २३.५ | २२.६ | २२.५ | - | **किमान तापमान (अं.से)** | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| ० | ८ | ८ | ६ | ८ | ८ | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | अंशत: ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| ९० | ९० | ९६ | ९५ | ९८ | ९८ | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९२ | ९१ | ९४ | ९२ | ९४ |
| ७४ | ७४ | ७१ | ६७ | ७८ | ९२ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ७८ | ७१ | ७३ | ७२ | ७८ |
| १.८ | २.२ | १.५ | २.७ | १.८ | १.८ | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ८ | ७ | ५ | ३ | ३ |
| ई.ऊ. | शांत | पू. | ऊ. | शांत | शांत | - | **वाऱ्याची दिशा** | आ.पू. | आ. | आ. | आ. | आ.द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| **१४४.२** | **३०१३.६** | **५१९७.२** |

**हवामान सारांश**

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | **प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार रायगड जिल्हयातील काही ठिकाणी दिनांक १७ ते २१ ऑक्टोबर, २०२० दरम्यान हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून आकाश ढगाळ राहील.** |
| **इशारा** | **दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० रोजी रायगड जिल्हयातील तुरळक ठिकाणी विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेचा इशारा देण्यात आला आहे** |
| **पाऊसाचा विस्तारित श्रेणी अंदाज** | **विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोकण विभागात दिनांक २१ ते २७ ऑक्टोबर, २०२० दरम्यान सरासरीपेक्षा जास्त पाऊसाची शक्यता आहे.** |

| पिक | अवस्था | हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला |
|---|---|---|
| **सामान्य सल्ला** | **-** | • दिनांक १६ १७ आणि १८ ऑक्टोबर २०२० दरम्यान समुद्र खवळलेल्या स्थितीत राहण्याची शक्यता वर्तवली असल्याने मच्छिमार बांधवांनी दिनांक १८ ऑक्टोबर २०२० पर्यंत मासेमारीसाठी समुद्रात जावू नये. |
| **खरीप भात** | **दाणे भरणे (गरव्या जाती), पक्वता (निमगरव्या आणि हळव्या जाती)** | • दिनांक १३, १४ आणि १५ ऑक्टोबर २०२० दरम्यान मेघगर्जनेसह आणि विजेच्या कडकडाटासह झालेल्या पाऊसामुळे शेतातील उभे तयार भात पडले असल्यास अशा भाताच्या लोंब्या पारंपारिक पद्धतीप्रमाणे वेचून सुरक्षित ठिकाणी आणून वाळविण्यासाठी पसरून ठेवावे. पडलेले भात भिजल्यामुळे कोंब फुटण्याची शक्यता असते त्यामुळे तातडीने अशा शेतातील लोंब्या वेचून सुरक्षित ठिकाणी आणल्यास काही प्रमाणात नुकसान कमी होण्यास मदत होईल.<br>• भात खाचरातील पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी आणि गरवे भात दाणे भरण्याच्या अवस्थेत असल्याने खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी. पर्यंत नियंत्रित करावी.<br>• हवामान अंदाजानुसार हलक्या पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने तयार भात पिकाची कापणी पाउसाची उघडीप असताना करावी आणि कापणी केलेले भात शेतात न ठेवता लगेचच सुरक्षित ठिकाणी नेऊन लगेच मळणी करावी आणि उत्पादीत पिक कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी वाळविण्यासाठी पसरून ठेवावे. |
| **नागली/ वरी** | **पक्वता** | • दिनांक १३, १४ आणि १५ ऑक्टोबर २०२० दरम्यान मेघगर्जनेसह आणि विजेच्या कडकडाटासह झालेल्या पाऊसामुळे शेतातील उभे तयार झालेले नागली, वरीचे पिक पडले असल्यास पडलेल्या नाचणी आणि वरीच्या लोंब्या वेचून सुरक्षित ठिकाणी आणून वाळविण्यासाठी पसरून ठेवावे.<br>• नाचणी, वरी पिक क्षेत्रातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• हवामान अंदाजानुसार हलक्या पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने तयार नागली/ वरी पिकाची कणसे विळ्याने कापून कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी वाळविण्यासाठी पसरून ठेवावे आणि वाळल्या नंतर मळणी करावी. |
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • दिनांक १३, १४ आणि १५ ऑक्टोबर २०२० दरम्यान झालेल्या पाऊसामुळे आंबा नवीन लागवड केलेल्या बागेतील साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• ढगाळ पाऊसाळी हवामानामुळे आंब्याच्या कोवळ्या पालवीवर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी पाऊसाची उघडीप असताना १ टक्के बोर्डोमिश्रणाची किंवा कार्बेन्डॅझिम १२% + मन्कोझेब ६३% या संयुक्त बुरशीनाशकाची १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **काजू** | **वाढीची अवस्था** | • दिनांक १३, १४ आणि १५ ऑक्टोबर २०२० दरम्यान झालेल्या पाऊसामुळे काजू नवीन लागवड केलेल्या बागेतील |

| | | |
|---|---|---|
| | | साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• ढगाळ पाऊसाळी हवामानामुळे काजूच्या कोवळ्या पालवीवर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी पाऊसाची उघडीप असताना १ टक्के बोर्डोमिश्रणाची किंवा कार्बेन्डॅझिम १२% + मन्कोझेब ६३% या संयुक्त बुरशीनाशकाची १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **नारळ** | **फळधारणा** | • दिनांक १३, १४ आणि १५ ऑक्टोबर २०२० दरम्यान झालेल्या पाऊसामुळे नारळ बागेतील साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• दिनांक १३, १४ आणि १५ ऑक्टोबर २०२० दरम्यान झालेल्या पाऊसामुळे आर्द्रतेत वाढ होवून नारळावर बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने माडाचे रोगापासून संरक्षण करण्यासाठी बागेची साफसफाई करून १ टक्का बुरशीनाशकाची शेंड्याजवळ फवारणी पाऊसाची उघडीप असताना करावी. |
| **सुपारी** | **फळधारणा** | • दिनांक १३, १४ आणि १५ ऑक्टोबर २०२० दरम्यान झालेल्या पाऊसामुळे सुपारी बागेतील साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• दिनांक १३, १४ आणि १५ ऑक्टोबर २०२० दरम्यान झालेल्या पाऊसामुळे आर्द्रतेत वाढ होवून सुपारीवर बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने सुपारीचे रोगापासून संरक्षण करण्यासाठी बागेची साफसफाई करून १ टक्का बुरशीनाशकाची पानांच्या बेचक्यात फवारणी पाऊसाची उघडीप असताना करावी. |
| **हळद** | **कंद अवस्था** | • दिनांक १३, १४ आणि १५ ऑक्टोबर २०२० दरम्यान झालेल्या पाऊसामुळे हळद बागेतील साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **भाजीपाला रोपवाटिका व नवीन फळबाग लागवड** | **वाढीची अवस्था** | • दिनांक १३, १४ आणि १५ ऑक्टोबर २०२० दरम्यान झालेल्या पाऊसामुळे नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला रोपवाटीकेतील साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **कुकुटपालन** | **-** | • ब्रॉयलर पक्षांना तीन आठवड्यापर्यंत त्यांच्या वजनानुसार ब्रॉयलर स्टार्टर व पुढे चार ते सहा आठवड्यापर्यंत ब्रॉयलर फिनिशर खाद्य द्यावे.<br>• ४ ते १० दिवसांच्या पिल्लांना राणीखेत रोगावर पशुवैद्यकीय अधिकारी सल्ल्याने लसीकरण करून घ्यावे. पक्ष्यांच्या आणि शेडच्या स्वच्छतेकडे नियमित लक्ष द्यावे.<br>• पक्षी गादी पद्धतीने (डीप लिटर) पद्धतीने जोपासली असल्यास गादी ओली होणार नाही याकडे लक्ष द्यावे. गादी आठवड्यातून एकदा हलवावी व महिन्यातून एकदा २ टक्के चुना गादीत मिसळावा. |

**टिप: पाऊसाची उघडीप असताना खते द्यावीत तसेच कीटकनाशकाच्या व बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात. पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.**

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**